क्र.पोमसं/३०/कोविड-१९/शा.नि./मुदतवाढ/५९/२०२०. मुंबई, दिनांक ०१ /११/२०२०

**विषय :-** "कोविड-१९" च्या सार्वत्रिक साथीचा प्रादूर्भाव रोखण्याकरिता राज्यात लॉकडाऊन अंमलात असेपर्यंत पोलीस महासंचालक, म. राज्य यांच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी / अंमलदार यांना पोलीस सेवा निवासस्थाने ताब्यात ठेवण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

*****

**परिपत्रक**

शासन निर्णय, गृह विभाग, क्र.शानिवा-०१२०/प्र.क्र.१०९/पोल-७, दिनांक २६/१०/२०२० ची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे.

२. खालील घटक प्रमुखांनी सदर शासन निर्णयातील तरतुदींनुसार शासकीय निवासस्थानाच्या मुदतवाढीबाबत आवश्यक ती कारवाई करावी.

**( अनिल पां. सावंत )**
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (लेखा) (अति.कार्य.)
पोलीस महासंचालक, म.राज्य,मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई / नागरी हक्क संरक्षण, मुंबई / लोहमार्ग, मुंबई / राज्य राखीव पोलीस बल, मुंबई / वाहतूक, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह) (बृहन्मुंबई वगळून)
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.राज्य, मुंबई / बिनतारी संदेश विभाग, पुणे / वाहतूक, मुंबई / लोहमार्ग, मुंबई / राज्य राखीव पोलीस बल, मुंबई / गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे / दहशतवाद विरोधी पथक, म.राज्य, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह) (बृहन्मुंबई वगळून)
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर / विशेष सुरक्षा विभाग, दादर, मुंबई / फोर्स वन, मुंबई / नागरी हक्क संरक्षण, मुंबई / मोटार परिवहन, पुणे / राज्य राखीव पोलीस बल, नागपूर / पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हा / लोहमार्ग / बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे / पूर्व विभाग, नागपूर / विशेष कृती दल)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १६ / राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर / धुळे
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे / अ.अ.प्र.कें., नागपूर

प्रत,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.१६, ३९ पोमसं कार्यालय.

"COVID-19" च्या सार्वत्रिक साथीचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता राज्यात *"Lockdown"* अंमलात असेपर्यंत पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना पोलीस सेवा निवासस्थाने ताब्यात ठेवण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

27 OCT 2020

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्र.शानिवा-०१२०/प्र.क्र.१०९/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक २६ ऑक्टोबर २०२०.

वाचा :-

१) शा.नि., गृह विभाग, क्र.आरएसए-०५११/प्र.क्र.२४२/पोल-७, दिनांक १७.०६.२०११.

२) शा.नि., गृह विभाग, क्र.आरएसए-०७९७/१४५/प्र.क्र.१०/पोल-७, दिनांक १८.११.२००५.

३) शा.नि., गृह विभाग, क्र.शानिवा-०१२०/प्र.क्र.१०९/पोल-७, दिनांक ३०.०७.२०२०

४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/ ३०/ कोविड-१९/ शा.नि./ मुदतवाढ/ ५९/२०२०, दिनांक २६.०८.२०२०

प्रस्तावना.

कर्तव्य बजावत असताना घडलेल्या दुर्घटनेत एखाद्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी याचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना तीन वर्षांपर्यंत किंवा अशा पोलीस अधिकारी/ कर्मचारी याच्या नियत वयमानाने सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत, यापैकी जी तारीख अगोदरची असेल तोपर्यंत, अनुज्ञाप्ती शुल्क भरुन, सेवा निवासस्थान ताब्यात ठेवण्यास शा.नि., गृह विभाग, क्र.आरएसए-०५११/प्र.क्र.२४२/पोल-७, दिनांक १७.०६.२०११, द्वारे परवानगी देण्यात आली आहे.

२. तसेच, बदली/ सेवानिवृत्ती/ सक्तीने सेवानिवृत्त/ बडतर्फी/ वैद्यकीय अपात्रता/ सेवेत असताना अकाली निधन, इत्यादी प्रकरणांमध्ये पोलीस सेवा निवासस्थानांमध्ये राहणाऱ्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना किंवा, यथास्थिती, त्यांच्या कुटुंबियांना, शा.नि., गृह विभाग, क्र.आरएसए-०७९७/१४५/प्र.क्र.१०/पोल-७, दिनांक १८.११.२००५, अनुसार पहिले तीन महिने भाडेमाफ सवलत आणि त्यापुढील जास्तीत जास्त सहा महिने (घटनेपासून नऊ महिने) विवक्षित प्रकरणे खेरीज करुन, मुदतवाढ अनुज्ञेय आहे.

३. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्या बाबतीत, तीन महिन्यांची भाडेमाफ सवलत किंवा सक्षम प्राधिका-याने दिलेली मुदतवाढ, ही *"Lockdown"* अंमलात आल्यानंतर (दिनांक २३.०३.२०२० नंतर) संपली किंवा संपणार असेल, अशा प्रकरणांमध्ये अर्जदाराने विनंती केलेली तारीख किंवा *"Lockdown"* अंमलात असेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, सेवा निवासस्थान ताब्यात ठेवण्यास शा.नि., गृह विभाग, दिनांक ३०.०७.२०२०, द्वारे मुदतवाढ देण्यात आली आहे.

४. त्याच धर्तीवर, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखालील इतर पोलीस आस्थापनांवरील पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्या बाबतीतही सेवा निवासस्थाने ताब्यात ठेवण्यास मुदतवाढ देण्याबाबत शासन आदेश व्हावेत, अशी विनंती पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाने केली आहे. त्यास अनुलक्षून शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखालील, पोलीस आयुक्तालय, बृहन्मुंबई, वगळता इतर पोलीस आस्थापनांवरील सेवा निवासस्थानांच्या बाबतीत:

१) ज्या प्रकरणांमध्ये, तीन महिन्यांची भाडेमाफ सवलत ही *"Lockdown"* अंमलात आल्यानंतर *(दिनांक २३.०३.२०२० नंतर)* संपली किंवा संपणार असेल, त्या प्रकरणांमध्ये अर्जदाराने विनंती केलेली तारीख किंवा *"Lockdown"* अंमलात असेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, अनुज्ञाप्ती शुल्क भरण्याच्या अटीवर, सेवा निवासस्थान ताब्यात ठेवण्यास अर्जदार पोलीस अधिकारी/ कर्मचारी किंवा, यथास्थिती, त्याचे कुटुंबीय यांना, याद्वारे, मुदतवाढ देण्यात येत आहे .

२) ज्या प्रकरणांमध्ये, सक्षम प्राधिकाऱ्याने *(संबंधित पोलीस घटकप्रमुख किंवा राज्य शासन, गृह विभाग)* सेवा निवासस्थान ताब्यात ठेवण्यास दिलेली मुदतवाढ ही *"Lockdown"* अंमलात आल्यानंतर *(दिनांक २३.०३.२०२० नंतर)* संपली किंवा संपणार असेल, त्या प्रकरणांमध्ये अर्जदाराने विनंती केलेली तारीख किंवा *"Lockdown"* अंमलात असेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, अनुज्ञाप्ती शुल्क भरण्याच्या अटीवर, अर्जदार पोलीस अधिकारी/ कर्मचारी किंवा, यथास्थिती, त्याचे कुटुंबीय यांना, याद्वारे, आणखी मुदतवाढ देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

२८.१०.२०२०

(हरेश्वर सहाणे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

15

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्य मंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. गृह मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
६) मा. राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत-

१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, म.रा., मुंबई.
२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
३) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) निवड फाईल (पोल-७).